15 July 2026 page 01_Layout 1 14-07-2026 08:42 PM Page 1


कायदेविषयक मार्गदर्शन मोफत

JUSTICE FOR ALL
ADVO CATE

संपर्क
ॲड . सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३०४५१



RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

बुधवार १५ जुलै २०२६ | वर्ष : ६ | अंक : १९५ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Wednesday, 15 July 2026 | Year : 6 | Issue : 195 | Daily | Rate: Rs. 5/-


**दि. १५ जुलै २०२६**



१९४२- मजूर मंत्री झाल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अभिनंदन करणारी सभा.

१९४६- पुणे कौन्सिल हॉल वर मोर्चा.

१९४७- ब्रिटिश संसदेने भारताच्या स्वातंत्र्याचा ठराव संमत केला.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

# महत्वाच्या बातम्या

## लेखिका तस्लिमा नसरीन १९ वर्षांनंतर कोलकाताला परतणार

**कोलकाता :** प्रसिद्ध आणि वादग्रस्त बांग्लादेशी लेखिका तस्लिमा नसरीन जवळपास दोन दशकांच्या (१९ वर्षांच्या) प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर कोलकात्यात परत येत आहेत. त्यांच्या लिखाणाविरोधात झालेल्या हिंसक आंदोलनांनंतर २००७ मध्ये त्यांना शहर सोडण्यास भाग पडले होते. पश्चिम बंगालमध्ये नुकतेच सत्तेवर आलेले भाजप सरकार, या घडामोडीला एक मोठा राजकीय विजय आणि धार्मिक कट्टरतावादाला असलेल्या आपल्या अढळ विरोधाचे प्रतीक म्हणून सादर करत आहे. तस्लिमा नसरीन यांनी स्वतः सोशल मीडियावर जाहीर केले आहे की, त्या १ ऑगस्ट रोजी कोलकाता येथील रवींद्र सदनात होणाऱ्या 'अतिरेकीवादविरोधी साहित्यिक कार्यक्रमा'त सहभागी होणार आहेत. त्या या कार्यक्रमात आपल्या कवितांचे वाचनही करणार आहेत. हा कार्यक्रम अनेक धर्मनिरपेक्ष आणि अतिरेकीवादविरोधी संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला जात आहे. बंगालमध्ये भाजप सरकार स्थापन झाल्यानंतर, या कार्यक्रमाकडे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि धर्मनिरपेक्षतेशी जोडलेले पाहिले जात आहे.

## रेल्वे वॅगनची रचना ठरवतील आता कंपन्या

**नवी दिल्ली :** भारतीय रेल्वे '५२ आठवडे, ५२ सुधारणा' या अभियानांतर्गत आपली सुधारणा मोहीम सुरू ठेवत आहे. रेल्वेमंत्र्यांनी मंगळवारी आठ नवीन सुधारणांची घोषणा केली. यापूर्वी दोन किंवा तीन टप्प्यांमध्ये नऊ सुधारणांची घोषणा करण्यात आली होती. यामुळे, आतापर्यंत जाहीर झालेल्या प्रमुख सुधारणांची एकूण संख्या १७ झाली आहे. रेल्वेचे कामकाज, कार्यप्रणाली आणि प्रवासी सुविधांमध्ये सुधारणा करणे हा या सुधारणांचा उद्देश आहे. नवीन सुधारणेअंतर्गत, रेल्वेने फ्लाय ॲशच्या वाहतुकीत बदल केले आहेत. वीज प्रकल्पांमधील फ्लाय ॲश आता उघड्या वॅगनऐवजी विशेष बंद कंटेनरमधून वाहून नेली जाईल. यामुळे धूळ आणि प्रदूषण कमी होईल, तसेच ओव्हरहेड लोडिंगमुळे वाहतूक अधिक सुरक्षित आणि सोपी होईल.

## नागपूर ग्रामीण आरटीओत भ्रष्टाचाराचे जाळे? दोन अधिकाऱ्यांवर आरोप

**नागपूर :** नागपूर ग्रामीण प्रादेशिक परिवहन कार्यालयातील दोन मोटार वाहन निरीक्षकांना जवळपास वर्षभरापासून सातत्याने एकाच लाभदायक पथकावर नियुक्ती देण्यात आल्याचा गंभीर आरोप करत शिवसेनेने (एकनाथ शिंदे गट) मंगळवारी 'आरटीओ पोलखोल आंदोलन' केले. कथित भ्रष्टाचार, गैरकारभार, चेकपोस्टवरील अनुपस्थिती, ओव्हरलोड वाहनांकडून अवैध वसुली आणि शासनाच्या महसुलाला फटका बसत असल्याचा दावा करत दोषी अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाईची मागणी करण्यात आली. मात्र, या सर्व आरोपांवर संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका अद्याप समोर आलेली नाही. शिवसेनेचे नेते नितीन तिवारी यांच्या नेतृत्वाखाली अनेक ट्रान्सपोर्टर आणि शिवसैनिकांनी नागपूर ग्रामीण प्रादेशिक परिवहन कार्यालयासमोर आंदोलन केले. आरटीओतील कथित भ्रष्टाचार, अधिकाऱ्यांची निष्क्रियता आणि गैरकारभाराविरोधात हे आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान "भ्रष्टाचार मुर्दाबाद", "कलबीर कलसी व हेमंत सोलंकर यांना निलंबित करा" तसेच "विजय चौहान होशात या" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

## न्यायालयाने 'ॲमेझॉन सेलर सर्व्हिसेस'ला ठोठावला दंड

**नवी दिल्ली :** ऑनलाईन शॉपिंग करतांना फसवणूक झाल्यास ग्राहक गप्प बसत नाहीत, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. एका महिला इंजिनिअरने ऑनलाईन मागवलेले बूट वेगळेच आल्याने ते परत केले, मात्र विक्रेत्याने पैसे देण्यास नकार दिला. अखेर या प्रकरणात ग्राहक न्यायालयानं ई-कॉमर्स क्षेत्रातील दिग्गज कंपनी 'ॲमेझॉन सेलर सर्व्हिसेस'ला चांगलाच दणका दिला आहे. न्यायालयानं ग्राहकाला झालेल्या मानसिक त्रासाबद्दल आणि न्यायालयीन खर्चापोटी ॲमेझॉन सेलर सर्व्हिसेसला एकूण १२,००० रुपयांचा दंड ठोठावला असून, बुटांचे पैसेही परत करण्याचे आदेश दिले आहेत. केरळमधील कन्नूर जिल्ह्यातील अनिमा एम. या एका नामांकित कंपनीत अभियंता म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी २२ सप्टेंबर २०२५ रोजी ॲमेझॉनवरून सुमारे ५,२०० रुपयांची खरेदी केली होती. यामध्ये १,९४५ रुपयांच्या 'स्केचर्स' ब्रँडच्या काळ्या रंगाच्या बुटांचा समावेश होता. यासाठी त्यांनी GPay द्वारे पैसेही दिले होते.

## पावसाळी अधिवेशनापूर्वी वांगचुक, दिपकेंच्या आंदोलनाला धार चढणार

# २० जुलैला 'चलो संसद'

### राहुल गांधी, खर्गे, राऊतांसह २० नेते जंतर-मंतरवर हजेरी लावणार?

**नवी दिल्ली :** नीटपेपरफुटी प्रकरणी कॉक्रोच जनता पार्टी गेल्या २५ दिवसांपासून दिल्लीत आंदोलन करत आहे. कॉक्रोच जनता पार्टीच्या या आंदोलनाला सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी पाठिंबा दिला असून, ते स्वतः १७ दिवसांपासून जंतर मंतरवर उपोषण करत आहेत. नीटपेपरफुटीची जबाबदारी स्वीकारुन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा आणि आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी कॉक्रोच जनता पार्टीने केली आहे. २५ दिवसांनंतरही सरकारकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने आता पार्टीने देशातील २० बड्या नेत्यांना या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे, संजय राऊत, जे. पी. नड्डा, नितीन नबीन, ओवेसी, ओमर अब्दुल्ला यासह २० नेत्यांना पार्टीच्या वतीने पत्र पाठविण्यात आले आहे.

कॉक्रोच जनता पार्टीचे २० नेत्यांना पत्र

कॉक्रोच जनता पार्टीच्या वतीने शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. सोनम वांगचुक देखील या मागणीसाठी गेल्या १७ दिवसांपासून उपोषण करत आहेत. देशभरातून विविध नेत्यांनी दिपके आणि वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. पण, सरकारकडून चर्चेसाठी अद्याप कोणीही समोर आलेले नाही. यानंतर आता कॉक्रोच जनता पार्टीकडून देशातील २० बड्या नेत्यांना पत्र पाठविण्यात आले आहे. नेत्यांनी जंतर-मंतरवर येऊन आंदोलनाला आणि सोनम वांगचुक यांना पाठिंबा द्यावा, अशी विनंती या पत्रातून करण्यात आली आहे.

### २० जुलैला 'चलो संसद'

**कॉक्रोच जनता पार्टीकडून 'चलो संसद' मार्चची घोषणा करण्यात आली आहे. २० जुलै रोजी हे मार्च आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये अनेक नेत्यांनी सहभागी होण्याची तयारी दर्शवली आहे. विशेष म्हणजे २० तारखेपासून संसदेचे पावसाळी अधिवेशन देखील सुरु होत आहे. राहुल गांधींसह विविध नेत्यांनी कॉक्रोच पार्टीच्या आंदोलनात हजेरी लावल्यास अधिवेशनात हा मुद्दा गाजण्याची शक्यता आहे. तसेच, आंदोलनाची धारही तीव्र होण्याची शक्यता आहे. दरम्यान, आता या २० नेत्यांच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे.**




### कोणत्या नेत्यांचा समावेश

कॉक्रोच जनता पार्टीकडून भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्यासह जे.पी. नड्डा यांना देखील पत्र पाठवले आहे. राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे, कनिमोझी. तिरुची सिवा, अखिलेश यादव, राम गोपाल वर्मा, लावू श्री कृष्णा देवारायालू, संजय कुमार झा, संजय राऊत, तेजस्वी यादव, मिश्रा भारती, पी. व्ही. मिथून रेड्डी, चंद्र शेखर आझाद, जे. पी. नड्डा, नितीन नबीन, चंद्रबाबू नायडू, विजय, ओवेसी, ओमर अब्दुल्ला, अगा सईद रुहुल्ला मेहदी अशा २० नेत्यांना पत्र पाठविण्यात आले आहे. यातील काही नेत्यांनी आंदोलनाला पाठिंबा दर्शवला आहे. बाकिच्यांनी आंदोलनस्थळी देऊन देशातील युवकांना पाठिंबा द्यावा, असे आवाहन कॉक्रोच जनता पार्टीने केले आहे.

### अखिलेश यादव यांनी सोनम वांगचुक यांना हे मोठे आवाहन केले

सपा अध्यक्ष अखिलेश यादव यांनी, 'कॉकरोच जनता पार्टी'च्या समर्थकांसोबत उपोषणाला बसलेल्या प्रसिद्ध पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांना उपोषण सोडण्याचे आवाहन केले आहे. त्यांची खालावलेली प्रकृती पाहून अखिलेश यादव म्हणाले की, भाजप सरकार भ्रष्ट आणि निर्दयी आहे. त्यांच्यासाठी कोणाच्याही जीवाला किंमत नाही.

## इयत्ता नववीसाठी अनिवार्य त्रिभाषा धोरणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार, सीबीएसई आणि एनसीईआरटीला बजावली नोटीस




**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयः इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी तीन भाषांचा अभ्यास अनिवार्य करणाऱ्या सीबीएसईच्या नवीन धोरणावर सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी केंद्र सरकार, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (एनसीईआरटी) आणि केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) यांच्याकडून उत्तर मागवले आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. जॉयमाल्य बागची आणि न्या. व्ही. मोहन यांचा समावेश असलेल्या खंडपीठाने, या प्रकरणात दाखल झालेल्या दोन नवीन याचिकांवर सुनावणी करतांना, संबंधित पक्षांना नोटीस बजावली. न्यायालयाने सर्व पक्षांना १० दिवसांच्या आत आपले उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले. सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश म्हणाले, 'आम्ही २९ जुलै रोजी या प्रकरणाची सुनावणी घेऊ.' अमनदीप कौर आणि अर्पण रॉय चौधरी यांनी नवीन याचिका दाखल केल्या आहेत. या याचिकांमध्ये केंद्र सरकार, सीबीएसई आणि एनसीईआरटी यांना पक्षकार म्हणून नाव देण्यात आले आहे. याचिकाकर्त्यांचे प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ वकील आनंद ग्रोव्हर आणि गोपाल शंकरनारायणन यांनी न्यायालयासमोर अनेक व्यावहारिक आणि कायदेशीर मुद्दे उपस्थित केले.

ज्येष्ठ वकील आनंद ग्रोव्हर यांनी असा युक्तिवाद केला की, ही प्रणाली शिक्षण हक्क कायद्याचे (RTE) उल्लंघन करते आणि विद्यार्थ्यांना निवडीचा पर्याय न देता त्यांच्यावर भाषा लादते.

त्यांनी न्यायालयाला विचारले, 'जर पंजाबी शिकवली गेली आणि संस्कृत नाही, तर शिक्षक कुठून येणार?' ज्येष्ठ वकील गोपाल शंकरनारायणन यांनी निदर्शनास आणून दिले की, राज्यांनी १ जुलैपर्यंत सर्व पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते, परंतु आतापर्यंत २२ भाषांपैकी केवळ तीनच भाषांची पाठ्यपुस्तके उपलब्ध झाली आहेत. यामुळे शिक्षक आणि संसाधनांची तीव्र कमतरता निर्माण होईल, असे ते म्हणाले.

शंकरनारायणन यांनी असेही निदर्शनास आणून दिले की, इंग्रजीकडे आता एक गैर-भारतीय भाषा म्हणून पाहिले जात आहे, ज्यामुळे नवीन प्रणालीच्या अंमलबजावणीत आणखी गुंतागुंत निर्माण होऊ शकते.

याचिकाकर्त्यांच्या वतीने हजर असलेले ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी न्यायालयाला सांगितले की, जर आधीच इंग्रजी आणि फ्रेंच शिकणाऱ्या विद्यार्थ्याला नववी इयत्तेत अचानक तमिळसारखी नवीन भाषा शिकायला सांगितली, तर शिक्षक, पायाभूत सुविधा आणि इतर सोयीसुविधा कुठून येणार? ते म्हणाले की, अशी प्रणाली अचानक लागू केल्याने विद्यार्थी आणि शाळा या दोघांसाठीही समस्या निर्माण होऊ शकतात.

सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी यांना सीबीएसईच्या तयारीवर अहवाल सादर करण्यास सांगितले होते. हे धोरण राबवण्यासाठी मंडळाकडे पुरेशी संसाधने आणि यंत्रणा आहेत की नाही, हे न्यायालयाला जाणून घ्यायचे होते. १५ मे रोजी जारी केलेल्या एका परिपत्रकात, सीबीएसईने म्हटले आहे की १ जुलै २०२६ पासून इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी तीन भाषा अनिवार्य असतील. या तीन भाषांपैकी किमान दोन भाषा भारतीय वंशाच्या असणे आवश्यक आहे.

# दीक्षाभूमी प्रकरणी महिला संघटना व विविध बौद्ध संघटनांचे पोलीस आयुक्तांना निवेदन

### तातडीने कारवाईचे आदेश; पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांची ग्वाही

**नागपूर :** दीक्षाभूमीवरील भिक्षुणी विशाखा यांच्याशी कथित विनयभंग, मारहाण व धमकी प्रकरणातील आरोपी माया उके आणि मंगला उईके यांच्यावर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी पुरोगामी महिला संघटना, दीक्षाभूमी बचाव-विस्तारीकरण विकास-सौंदर्यीकरण समिती आणि विविध बौद्ध संघटनांच्या शिष्टमंडळाने नागपूरचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांच्याकडे केली. यावेळी पोलीस आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना त्वरित कारवाईचे आदेश दिल्याची माहिती शिष्टमंडळाने दिली. शिष्टमंडळाने सांगितले की, ९ जुलै रोजी दीक्षाभूमीवर भिक्षुणी विशाखा यांचे सार्वजनिक ठिकाणी चीवर उतरविण्याचा प्रयत्न करण्यात आला. या घटनेचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्याने बौद्ध व आंबेडकरी समाजात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. या प्रकरणी ११ जुलै रोजी बजाजनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ अंतर्गत कलम ७४, ७६, २९६, ३५१(२) व ३५२(३)(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मात्र, गुन्हा दाखल होऊनही आरोपींवर अद्याप प्रभावी कारवाई झालेली नसल्याची खंत शिष्टमंडळाने व्यक्त केली. उलट दुसऱ्याच दिवशी माया उके व मंगला उईके या ६० ते ७० जणांसह पुन्हा दीक्षाभूमीवर जाऊन भिक्षुणी विशाखा यांना धमकावल्याचा आरोप करण्यात आला. त्यामुळे आरोपींमध्ये पोलिसांचा धाक उरलेला नसून तातडीने अटक करण्याची मागणी करण्यात आली. यावर पोलीस आयुक्त



विश्वास नांगरे पाटील यांनी दीक्षाभूमीची बदनामी होत असल्याबद्दल दुःख व्यक्त करत समाजातील वाद शांततेने सोडविण्याचे आवाहन केले. मात्र, सार्वजनिक ठिकाणी एखाद्या महिलेचे चीवर उतरविण्याचा प्रयत्न हा अत्यंत गंभीर गुन्हा असल्याचे शिष्टमंडळाने निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्याचे आदेश दिले. तसेच माया उके आणि मंगला उईके यांच्याविरुद्ध त्वरित कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी ग्वाही शिष्टमंडळाला दिली.

या प्रकरणात निष्पक्ष व तातडीची कारवाई करून दीक्षाभूमी परिसरातील शांतता आणि कायदा-सुव्यवस्था कायम राखावी, अशी मागणी विविध बौद्ध व महिला संघटनांनी केली आहे.

**टीप :** *माया उके व मंगला उईके यांची नावे निवेदनातील आरोपांच्या आधारे नमूद करण्यात आली आहेत. प्रकरणाचा तपास सुरू असून दोष निश्चित होणे न्यायालयीन प्रक्रियेवर अवलंबून आहे.*

## ५ .७९ कोटींचे एमडी ड्रग्ज दिल्लीहून पुण्यात!

**पुणे :** कात्रज परिसरातून तब्बल ५ कोटी ७९ लाख रुपयांचे मेफेड्रॉन ड्रग्ज जप्त केल्याप्रकरणी अटक केलेला आरोपी प्रशांत सावंत याने हा ड्रग्जचा साठा दिल्ली येथून आणला होता. 'बेनी' नावाच्या एका नायजेरियन महिलेच्या सांगण्यावरून तो हा साठा बंगळुरू येथे देण्यासाठी जात असताना पुणे पोलिसांनी त्याला कात्रज येथे पकडले असल्याची माहिती पोलिसांनी न्यायालयात दिली. दरम्यान, न्यायालयाने आरोपीच्या पोलिस कोठडीत दि. १८ जुलैपर्यंत वाढ केली आहे. आरोपी प्रशांत सुरेश सावंत (वय ३८, रा. येरवडा, सध्या रा. लोहगावरोड, पुणे) याला दि. ८ जुलै रोजी कात्रज चौकातील आयसीआयसीआय बँकेसमोरील नवीन उड्डाणपुलाखाली अटक केली होती. त्याच्या ताब्यातून २ किलो ८९५ ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (एम.डी.) हा अमली पदार्थ (किंमत ५,७९,००,००० रुपये), एक मोबाइल आणि एक सफारी कपड्यांची बॅग असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क) आणि २२(क) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


एसके हॉलिडेजच्या ५ देशीय यात्रा



इंग्लंड,स्कॉटलंड,वेल्स आणि संपूर्ण आयर्लंड

प्रस्थान :- नागपूर १० ऑगस्ट 2026

विशेष आकर्षण :- बाबासाहेबांचे लंडनस्थित घर, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, ग्रेजइन

संपर्क :-एसके हॉलीडेज नागपूर 9422126992/7507259851



डॉ. माधव एस. जांभूळे

संस्थापक, संथागार फाउंडेशन नागपूर.



जन्म 15.07.1953




: शुभेच्छूक :

मंगला जांभुळे, कृपाली विनीत जांभूळे, कनिष्का, चेरी, जेरी, सुप्रिया सुरज गेडाम , वारीज गेडाम. दैनिक बहुजन सौरभ परिवार आणि संथागार फाउंडेशन मित्र मंडळी.



नोवानला



जन्म दि. १५-०७-२४

जन्म दिवसाच्या मंगलमय शुभेच्छा

: शुभेच्छूक :

आई-बाबा-तारका, निलय बडवने
काकू-काका -शोको, अनय
छोटा भाऊ-आयुतो (जपान)
आजी-आजोबा-साधना - शुद्धोधन बडवने



रजि. नं. महाराष्ट्र नाग. ८०२/२०१८ व ३६४७७/२०१९

बुध्द विहार समन्वय समिती

व्दारा संचालित

बुध्दीस्ट हेरीटेज ॲण्ड कल्चर कन्झर्वेशन कमिटी

आयोजित

भुवनेश्वर, नंदन कानन ललीतगीरी खंडगीरी, रत्नगीरी, उदयगीरी, धौलगीरी, शांतीस्तुप, कोणार्क सन टेंपल, नवग्रह टेंपल, चंद्रभागा, समुद्र बीच, जगन्नाथ टेंपल, गोल्डन बीच, चील्का लेक, पूरी धम्मसहल (टायगर सफारी, लॉयन सफारी, बोटींग, बियर सफारी समाविष्ट)



गुरुवार दि. २४/९/२०२६ ते २९/९/२०२६ एकूण ६ दिवस ५ रात्र

दिनांक ८/९/२०२६ पर्यंत सहलीचा प्रवेश रद्द करता येईल. त्यानंतर रद्द केल्यास रक्कम परत मिळणार नाही.

सहलीसाठी देणगी रक्कम

१) प्रति व्यक्ती रु. १२१००/- (स्लीपर कोच प्रवास)
२) प्रति व्यक्ती रु.१४०००/- (ए.सी. 3 Tier प्रवास)
टिप : स्वत: टिकीट काढणाऱ्या व्यक्तीस रु. ११०००/- फक्त

अटी व नियम :
ही सहल बौद्ध पर्यटन स्थळे पाहण्याच्या उद्देशाने काढण्यात येत आहे. पर्यटकास खालील नियम बंधनकारक राहातील.
१) संपुर्ण प्रवासात मांसाहार व मद्यपान वर्ज्य राहील. २) पुर्ण रक्कम भरल्याशिवाय प्रवेश निश्चीत होणार नाही.
३) या प्रवासात सहकार्याच्या भावनेने प्रत्येकानी यावे. ४) रेल्वेतील प्रवासात समिती कडून जेवण मिळणार नाही.
५) क्यु.आर. कोड नी किंवा प्रत्यक्ष कार्यालयीन वेळेत (दुपारी ४ ते ५.३० वाजेपर्यंत) सम्यक बुध्द विहार जुनी वस्ती खामला, येथे केंद्रीय कार्यालयात रक्कम जमा करता येईल. • ऑनलाईन रक्कम भरल्यानंतर त्यांचा स्क्रिन शॉट पाठवावा. ६) २ महिने अगोदर (२४.७.२०२६ ला) आरक्षण सुरुवात होईल त्यामुळे सर्वांनी २०/७/२०२६ पर्यंत नगद रक्कम जमा करावी. ७) ५ दिवसाच्या प्रवासात जेवढे जास्ती जास्त स्थळ पाहता येतील तेवढे दाखविण्याचा त्याबद्दल माहिती गाईड कडून सांगण्याचा प्रयत्न केल्या जाईल.

Bank of India
BUDDHA VIHAR SAMANVAY SAMITI PALI BHASHA
SCAN & PAY
boim-874001501414@boi
रक्कम भरल्यानंतर Screen Shot पाठवावा

टिम मॅनेजर :- अशोकभाऊ सरस्वती बौद्ध मो. ८५३०९८०७४१

• संपर्कासाठी क्षेत्रानुसार प्रतिनिधी •

• दक्षिण-पश्चिम नागपूर - हिरामण वाघमारे - 9890181834, दिलीप बागडे - 8308001214, धेनुत्तम बोंबर्डे -9561561788 गौतम मोडक - 9423634984 • दक्षिण नागपूर- सिद्धार्थ खोब्रागडे - 9423122375, देवागीनी कांबळे - 9766916610,सुचिता बुरबुरे - 8459254940 • पश्चिम नागपूर- नरेश मेश्राम - 9423404861,तनुजा झिलपे - 8600350838, प्रमिला सोनवणे -8668712023 • मध्य नागपूर - मायाताई जामगडे- 9371592735, नलीनी वाळके- 9021043047 दामोधर लोखंडे- 7276081150 • उत्तर नागपूर - कांताप्रसाद रामटेके -8055383807, एम.व्ही. नाईक-9422818873 • पूर्व नागपूर-वामनराव निल - 9423680543, विश्वनाथ लोखंडे -8788261947

अधिक माहिती साठी संपर्क : ईजि. ए.के. पाटील -7972987584 प्रा.आनंद वासनिक -9822238757

15 July 2026 page 02_Layout 1 14-07-2026 05:01 PM Page 1



## बहुजन सौरभ संपादकीय

# ८ हजारांत विकले शिक्षकांचे भविष्य !

महाराष्ट्रातील टीईटी (शिक्षक पात्रता परीक्षा) पेपरफुटी प्रकरणाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की, भ्रष्टाचाराने राज्याच्या शिक्षण व्यवस्थेची मुळे पोखरून टाकली आहेत. आज विविध वर्तमानपत्रांमधून समोर आलेली धक्कादायक माहिती केवळ एका परीक्षा घोटाळ्याची नाही, तर ती संपूर्ण व्यवस्थेच्या नैतिक दिवाळखोरीची साक्ष आहे. ज्या राज्यात लाखो युवक-युवती रात्रंदिवस अभ्यास करून शिक्षक होण्याचे स्वप्न पाहतात, त्याच राज्यात काही भ्रष्ट अधिकारी, दलाल आणि सत्तेच्या आशीर्वादाने वावरणारे लोक केवळ ८ हजार रुपयांत शिक्षक पात्रतेचे प्रमाणपत्र विकत होते, ही घटना संतापजनक आणि लोकशाहीला काळिमा फासणारी आहे. शिक्षक घडविण्याची प्रक्रिया जर बाजारात विक्रीसाठी ठेवली जात असेल, तर उद्याची पिढी ज्ञानाने नव्हे तर भ्रष्टाचाराने घडेल. ही परिस्थिती महाराष्ट्रासाठी अत्यंत लज्जास्पद आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले होते, ‘शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे; जो ते पिईल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.’ परंतु आज शिक्षणालाच भ्रष्टाचाराच्या विळख्यात अडकवून त्या वाघिणीच्या दुधात विष मिसळण्याचे पाप केले जात आहे. ज्या शिक्षणातून सामाजिक न्याय निर्माण व्हायला हवा होता, त्याच शिक्षणाच्या प्रवेशद्वारावर दलालांनी भ्रष्टाचाराचे टोल नाके उभारले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आणखी एक महत्त्वपूर्ण विधान आज तितकेच समर्पक वाटते - ‘मनाचे संवर्धन हे मानवी अस्तित्वाचे अंतिम ध्येय आहे.’ परंतु मनाचे संवर्धन करणारा शिक्षकच जर पैशाने विकत घेतला गेला, तर विद्यार्थ्यांच्या मनात प्रामाणिकपणा, मूल्ये आणि संविधाननिष्ठा कोण रुजवणार? टीईटी पेपरफुटी ही काही पहिली घटना नाही. यापूर्वीही महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC), आरोग्य विभाग, पोलीस भरती, म्हाडा, वनविभाग, सरळसेवा भरती अशा अनेक भरती प्रक्रियांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. प्रत्येक वेळी सरकार चौकशीची घोषणा करते, काही अटक होते, काही दिवस गदारोळ होतो आणि नंतर सर्व काही शांत होते. मात्र, युवकांच्या आयुष्याची राख करणाऱ्यांना शिक्षा होण्याऐवजी अनेकदा राजकीय संरक्षण मिळते, अशी भावना समाजात निर्माण झाली आहे. ज्या तरुणाने चार-पाच वर्षे अभ्यास केला, कर्ज काढून क्लासेस लावले, कुटुंबाच्या अपेक्षा पेलल्या, त्याला अपयश मिळते; आणि दुसरीकडे काही हजार रुपये मोजणारा उमेदवार पात्र ठरतो. हा केवळ अन्याय नाही, तर संविधानाने दिलेल्या समान संधीच्या अधिकारावर उघडपणे घातलेला दरोडा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत स्पष्ट इशारा दिला होता, ‘संविधान कितीही चांगले असले, तरी ते राबविणारे लोक वाईट असतील तर संविधानही निष्प्रभ ठरेल.’ आज हीच परिस्थिती परीक्षा व्यवस्थेबाबत दिसून येत आहे. कायदे आहेत, नियम आहेत, तंत्रज्ञान आहे; पण ते प्रामाणिकपणे राबविण्याची इच्छाशक्ती नसल्यास भ्रष्टाचाराचे राक्षस पुन्हा पुन्हा जन्म घेत राहतील. या प्रकरणातील सर्वात भयावह बाब म्हणजे, पैशाने पात्र ठरलेला शिक्षक उद्या वर्गात उभा राहणार आहे. त्याच्याकडून शिकणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे, विचारांचे आणि भविष्याचे काय? एका भ्रष्ट शिक्षकामुळे शेकडो विद्यार्थ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते. म्हणूनच हा गुन्हा केवळ आर्थिक नाही, तर राष्ट्रद्रोहाइतकाच गंभीर सामाजिक गुन्हा मानला पाहिजे. आज राज्यकर्त्यांना एक प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे, भ्रष्टाचाराचे हे जाळे नेमके कोणाच्या संरक्षणाखाली वाढले? सामान्य युवकाला एका कागदासाठी महिनोंमहिने सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात; मग प्रश्नपत्रिका, निकाल आणि पात्रतेची माहिती दलालांपर्यंत इतक्या सहजपणे कशी पोहोचते? यामागे फक्त खालच्या पातळीवरील कर्मचारी असूच शकत नाहीत. या रॅकेटची मुळे सत्तेच्या आणि प्रशासनाच्या सर्वोच्च स्तरापर्यंत गेली आहेत का, याचीही निर्भीड चौकशी झाली पाहिजे. फक्त अटक करून, जामीन होऊ देऊन आणि वर्षानुवर्षे खटले चालवून उपयोग नाही. अशा गुन्ह्यांसाठी जलदगती न्यायालये, आजीवन शासकीय सेवाबंदी, मालमत्ता जप्ती आणि कठोर शिक्षा अनिवार्य केली पाहिजे. भ्रष्टाचारातून कमावलेला प्रत्येक रुपया सरकारने जप्त केला पाहिजे. आज महाराष्ट्रातील युवक संतप्त आहे. त्याच्या हातात पदवी आहे, गुणवत्ता आहे, मेहनत आहे; पण त्याच्या वाट्याला नोकरीऐवजी भ्रष्टाचार येतो. अशा परिस्थितीत तरुणांच्या मनात व्यवस्थेविषयी अविश्वास निर्माण होणे स्वाभाविक आहे. हा अविश्वास लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे सर्वात मोठे शस्त्र आहे. हे शस्त्र जर भ्रष्टाचाराच्या हातात गेले, तर समाजाचे भविष्य अंधारात जाईल. म्हणून टीईटी पेपरफुटी प्रकरण हा केवळ एका विभागाचा प्रश्न नाही; तो महाराष्ट्राच्या नैतिकतेचा, संविधानिक मूल्यांचा आणि पुढील पिढीच्या भविष्याचा प्रश्न आहे. सरकारने आता केवळ आश्वासने देऊन चालणार नाही. या घोटाळ्यातील प्रत्येक सूत्रधाराला शिक्षा, संपूर्ण भर्ती व्यवस्थेचे शुद्धीकरण आणि भ्रष्टाचारमुक्त परीक्षा प्रणाली निर्माण करणे हीच खरी शिक्षक, विद्यार्थी आणि संविधानाप्रती आदरांजली ठरेल. अन्यथा इतिहास एकच वाक्य लिहील, ‘ज्या महाराष्ट्राने महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे शिक्षणमहर्षी दिले, त्याच महाराष्ट्रात शिक्षणाचे भविष्य काही हजार रुपयांत विकले गेले.’●●

# राम नाम जपना पराया माल अपना !

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांना नागपूरमध्ये पत्रकारांनी अयोध्या राम मंदिरातील दानचोरीबाबत प्रश्न विचारला असता ते 'राम राम' म्हणत आपल्या गाडीत बसून निघून गेले… खरेतर या मंदिरातील दानरक्षणाची जबाबदारी राम जन्मभूमि तीर्थ क्षेत्र ट्रस्टकडे होती. परंतु तेच भक्षक झालेत अशा चर्चांना पेव फुटले आहे.**




अयोध्येतील राम मंदिर हे कोट्यवधी भारतीयांच्या श्रद्धेचे केंद्र आहे. अनेक दशकांच्या संघर्षानंतर उभारले गेलेले हे मंदिर केवळ धार्मिक वास्तू नाही, तर लाखो-कोट्यवधी भाविकांच्या भावविश्वाचे प्रतिक आहे. अशा पवित्र स्थळाशी संबंधित दानव्यवस्थेबाबत अनियमिततेचे आरोप समोर येणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. कोणत्याही धर्मस्थळात भक्तांनी अर्पण केलेले दान हे ईश्वराला समर्पित मानले जाते. त्यामुळे अशा दानाच्या व्यवस्थापनात पारदर्शकता, जबाबदारी आणि कायदेशीर उत्तरदायित्व असणे अत्यावश्यक आहे. अलीकडील घडामोडींमध्ये राम मंदिरातील दानाच्या व्यवस्थापनाबाबत विविध आरोप, चौकशी आणि गुन्हे नोंदविण्यात आल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांना पत्रकारांनी प्रश्न विचारल्याचे वृत्त आले. या विषयावर त्यांनी सविस्तर भाष्य न केल्यामुळे राजकीय आणि सामाजिक स्तरावर अनेक प्रतिक्रिया उमटल्या. सार्वजनिक जीवनातील प्रभावशाली व्यक्तींनी अशा संवेदनशील विषयांवर स्पष्ट भूमिका मांडावी, अशी अपेक्षा स्वाभाविकपणे व्यक्त केली जाते.

राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टची स्थापना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर केंद्र सरकारने जाहीर केलेल्या प्रक्रियेनुसार करण्यात आली. या ट्रस्टवर मंदिर उभारणी, व्यवस्थापन आणि दानाचा वापर याची जबाबदारी आहे. त्यामुळे ट्रस्टशी संबंधित कोणतीही आर्थिक अनियमितता केवळ एका संस्थेचा प्रश्न राहत नाही, तर ती संपूर्ण समाजाच्या विश्वासाशी जोडली जाते. श्रद्धेवर उभ्या असलेल्या संस्थांनी केवळ प्रामाणिक असणे पुरेसे नसते; त्या प्रामाणिक दिसल्याही पाहिजेत. या प्रकरणात काही व्यक्तींविरुद्ध गुन्हे दाखल झाल्याचे वृत्त आहे. तपास यंत्रणांनी आरोपींकडून रोख रक्कम आणि इतर साहित्य जप्त केल्याची माहितीही समोर आली आहे. या चौकशीचा अंतिम निष्कर्ष न्यायालयीन आणि तपास प्रक्रियेनंतरच स्पष्ट होईल. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीला दोषी किंवा निर्दोष ठरविण्याचा अधिकार न्यायव्यवस्थेलाच आहे. मात्र, या घटनेने दान व्यवस्थापनातील सुरक्षा आणि नियंत्रण यंत्रणांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. दानपेट्यांपर्यंत प्रवेश कोणाला होता? सुरक्षा प्रणाली कितपत सक्षम होती? सीसीटीव्ही नोंदींचे संरक्षण योग्य प्रकारे झाले का? आर्थिक लेखापरीक्षण किती नियमित झाले? या प्रश्नांची विश्वासार्ह उत्तरे समाजाला मिळणे आवश्यक आहे.

**|| विकास झाडे ||**

कारण श्रद्धेचा पाया विश्वासावर उभा असतो आणि विश्वासाला धक्का बसला तर त्याचे परिणाम दूरगामी असतात. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सार्वजनिक संस्थांमध्ये उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि कायद्याचे राज्य यावर विशेष भर दिला होता. त्यांचे प्रसिद्ध विचार आजही तितकेच महत्त्वाचे वाटतात, ‘संविधान कितीही चांगले असले तरी ते चालविणारे लोक चांगले नसतील तर संविधान निष्प्रभ ठरते.’ हीच बाब कोणत्याही धार्मिक किंवा सार्वजनिक संस्थेलाही लागू होते. नियम उत्कृष्ट असले तरी त्यांची प्रामाणिक अंमलबजावणी झाली नाही तर संस्था अडचणीत येते. धर्माचा वापर राजकारणासाठी आणि राजकारणाचा वापर धर्मासाठी झाला की सर्वांत मोठे नुकसान श्रद्धेचे होते. राम मंदिर हा कोणत्याही एका पक्षाचा किंवा संघटनेचा विषय नसून तो कोट्यवधी भाविकांच्या आस्थेचा विषय आहे. त्यामुळे मंदिराशी संबंधित प्रत्येक व्यवहार हा राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या पलीकडे जाऊन वस्तुनिष्ठपणे तपासला गेला पाहिजे. दोषी कोणताही असो, त्याच्यावर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे. गेल्या काही वर्षांत देशातील अनेक धार्मिक संस्थांनी डिजिटल दान, ऑनलाइन लेखापरीक्षण, स्वतंत्र ऑडिट आणि पारदर्शक आर्थिक अहवाल यांसारख्या प्रणाली स्वीकारल्या आहेत. अशा आधुनिक व्यवस्थापन पद्धती सर्व प्रमुख धर्मस्थळांमध्ये बंधनकारक करण्याची वेळ आली आहे. श्रद्धा ही अंधविश्वासावर नव्हे तर विश्वासार्ह व्यवस्थापनावर टिकते. या प्रकरणाने आणखी एक प्रश्न उपस्थित केला आहे. कोणतीही संस्था कितीही प्रतिष्ठित असली तरी तिच्या कामकाजावर स्वतंत्र देखरेख आवश्यक असते. लोकशाहीमध्ये कोणतीही संस्था प्रश्नांच्या पलीकडे नसते. प्रश्न विचारणे म्हणजे धर्माचा अपमान नव्हे; उलट सार्वजनिक विश्वास टिकविण्यासाठी आवश्यक असलेली लोकशाही प्रक्रिया आहे. राजकीय पक्षांनीही या विषयाकडे संयमाने पाहण्याची गरज आहे. आरोपांची चौकशी होण्यापूर्वी निष्कर्ष काढणे योग्य नाही, तसेच चौकशीच्या नावाखाली प्रकरण दडपण्याचाही प्रयत्न होऊ नये. सत्य बाहेर येणे हेच सर्वांच्या हिताचे आहे. दोषी व्यक्तींचे संरक्षण केल्यास त्याचा परिणाम संपूर्ण संस्थेच्या प्रतिमेवर होतो. रामायणातील राम हे सत्य, न्याय आणि कर्तव्याचे प्रतिक मानले जातात. त्यामुळे त्यांच्या नावाने चालणाऱ्या कोणत्याही संस्थेवर अन्याय, अपारदर्शकता किंवा भ्रष्टाचाराचे सावट पडणे ही अत्यंत दुर्दैवी बाब ठरेल. जर काही व्यक्तींनी श्रद्धेचा गैरवापर केला असेल, तर त्यांना वाचविणे म्हणजे रामाच्या आदर्शांनाच धक्का देणे होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले होते, ‘मनुष्य महान जन्माने नव्हे, तर आपल्या कर्माने होतो.’ ही शिकवण आज सर्व सार्वजनिक आणि धार्मिक संस्थांना लागू पडते. पद, प्रतिष्ठा किंवा धार्मिक ओळख कोणालाही कायद्यापेक्षा मोठे बनवू शकत नाही. आज गरज आहे ती भावनिक घोषणांची नव्हे, तर पारदर्शक प्रशासनाची. मंदिरांमध्ये येणाऱ्या प्रत्येक रुपयाचा हिशोब समाजासमोर ठेवला गेला पाहिजे. नियमित स्वतंत्र लेखापरीक्षण, मजबूत सुरक्षा व्यवस्था, डिजिटल नोंदी, सीसीटीव्हीचे सुरक्षित संग्रहण आणि सार्वजनिक वार्षिक अहवाल या उपाययोजना अनिवार्य करणे आवश्यक आहे. राम मंदिराशी संबंधित सध्याचे प्रकरण केवळ एका मंदिरापुरते मर्यादित नाही. ते देशातील सर्व धार्मिक आणि सार्वजनिक संस्थांसाठी एक इशारा आहे. श्रद्धेचे रक्षण केवळ भव्य मंदिरांनी होत नाही; ते प्रामाणिकपणा, उत्तरदायित्व आणि पारदर्शकतेने होते. तपास यंत्रणांनी निष्पक्षपणे सत्य समोर आणावे, दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई व्हावी आणि भाविकांचा विश्वास पुन्हा दृढ व्हावा, हीच या प्रकरणातून देशाची अपेक्षा आहे.●●

# महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी (महाजेनको)

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (MERC) प्रकरण क्र. 89/2026 मध्ये दिनांक 19 एप्रिल 2026 रोजी दिलेला अंतिमआदेश अत्यंत गंभीर परिणाम करणारा ठरू शकतो. या आदेशानुसार महाजेनकोच्या तब्बल 1600 मेगावॅट क्षमतेच्या दहा वीज निर्मिती युनिट्स 2030 पर्यंत बंद (Decommission) करण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, आयोगाने आपल्या आदेशात असे नमूद केले आहे की, महाजेनकोने या प्रस्तावा विरोधात कोणतेही प्रभावी प्रतिवेदन किंवा ठोस आक्षेप सादर केले नाहीत. त्यामुळे आयोगाने महाजेनकोला या प्रस्तावास संमती असल्याप्रमाणे निष्कर्ष नोंदविला. हा प्रश्न केवळ प्रशासकीय नाही तर महाराष्ट्राच्या ऊर्जा धोरणाशी संबंधित आहे. महाजेनकोची बाजू कोणी मांडली? महाजेनको ही महाराष्ट्र शासनाची सार्वजनिक वीज निर्मिती कंपनी आहे. अशा संस्थेच्या भवितव्याचा निर्णय होत असताना तिची प्रभावी बाजू आयोगासमोर का मांडली गेली नाही? जर महाजेनकोने प्रभावीपणे विरोधच केला नाही, तर त्याची जबाबदारी कोणाची? महाजेनको व्यवस्थापनाची ?ऊर्जा विभागाची? की हा निर्णय पूर्वनियोजित होता? या प्रश्नांची उत्तरे राज्यातील जनतेला मिळाली पाहिजेत. अदानी पॉवरच्या प्रस्तावाला प्राधान्य? या प्रकरणात खाजगी कंपन्यांचे दर विचारात घेण्यात आले.

यामध्ये सर्वात कमी दर अदानी पॉवरचा असल्याने त्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली असल्याचे सांगण्यात आले. परंतु याच ठिकाणी अत्यंत गंभीर विसंगती दिसून येते. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगा (MERC) च्याच आदेशातील आकडे वेगळे चित्र दाखवतात. हा दर दाखवून महाजेनकोची युनिट्स आर्थिकदृष्ट्या तोट्यात असल्याचा निष्कर्ष कसा काढण्यात आला? जर MERC ने स्वतःच कमी दर मंजूर केले असतील, तर त्याच आयोगाने त्या प्रकल्पांना बंद करण्याचा निर्णय कोणत्या आर्थिक विश्लेषणावर आधारित घेतला? हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. चंद्रपूर युनिट 3, 4, 5 आणि 6, बंद करण्याचा प्रस्ताव राज्यासाठी चिंताजनक व धक्कादायक आहे. ही युनिट्स अनेक वर्षे महाराष्ट्राच्या वीजपुरवठ्याचा कणा राहिली आहेत. राज्यातील विक्रमी वीज निर्मितीमध्ये त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांचा Plant Load Factor (PLF) अनेकवेळा उत्कृष्ट राहिला आहे. अनुभवी मनुष्यबळ उपलब्ध आहे. कोळसा पुरवठा साखळी विकसित आहे. अनेक प्रसंगी कमी खर्चात सातत्यपूर्ण वीज निर्मिती करण्यात या युनिट्स यशस्वी ठरल्या आहेत. अशा

**संपवून खासगी वीज उत्पादकांना लाभ?**
**MERC च्या आदेशामागील गंभीर प्रश्नचिन्हे.**

परिस्थितीत ही युनिट्स बंद करण्यामागील तांत्रिक व आर्थिक कारणे सार्वजनिक केली गेली पाहिजेत. Renovation & Modernization (R&M) हा पर्याय का नाकारला? जर काही जुनी युनिट्स कार्यक्षम नसतील, तर त्यावर उपाय म्हणजे त्या बंद करणे नव्हे. त्याऐवजी Renovation & Modernization (R&M) हा अधिक व्यवहार्य पर्याय आहे. याच धोरणांतर्गत कोराडी येथील युनिट क्रमांक 6 चे आधुनिकीकरण करण्यात आले आणि त्यानंतर त्या युनिटची कार्यक्षमता मोठ्या प्रमाणात वाढली हे सिद्ध झाले आहे. नाशिक औष्णिक वीज केंद्राच्या संदर्भातही अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. सन 2014 मध्ये या प्रकल्पाच्या Renovation & Modernization (R&M) साठी जर्मनीच्या KfW या विकास बँकेच्या आर्थिक सहाय्याने प्रकल्प राबविण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. त्यावेळचे ऊर्जामंत्री स्वर्गीय अजितदादा पवार व राज्य मंत्रिमंडळाने या प्रस्तावास मान्यताही दिली होती. मात्र, त्यानंतर महाजेनकोकडून आवश्यक पाठपुरावा व कार्यवाही न झाल्यामुळे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पुढे सरकला नाही आणि अखेरीस KfW बँकेनेही आपली आर्थिक मदत मागे घेतली. नाशिक औष्णिक वीज केंद्र हे महाराष्ट्राच्या वीज ग्रीडच्या स्थैर्यासाठी (Grid Stability) अत्यंत महत्त्वाचे केंद्र आहे. या प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या वीजेचा खर्च काही प्रमाणात जास्त असला, तरी राज्याच्या ऊर्जा सुरक्षेसाठी आणि औद्योगिक विकासासाठी त्याचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे केवळ प्रति युनिट वीज निर्मिती खर्चाच्या आधारे या प्रकल्पाचे भवितव्य ठरविणे योग्य ठरणार नाही. यापुढे नाशिक येथे सुमारे 500 मेगावॅट क्षमतेचे नवीन वीज निर्मिती युनिट उभारण्याचाही प्रस्ताव होता. मात्र, ओझर येथील दुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL) च्या विमानतळामुळे प्रस्तावित चिमणीच्या उंचीबाबत तांत्रिक अडचणी असल्याचे कारण पुढे करण्यात आले आणि हा प्रस्तावही पुढे गेला नाही. मात्र या स्पष्टीकरणाबाबतही अनेक प्रश्न उपस्थित होतात. मुंबईसारख्या महानगरात आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरात असंख्य गगनचुंबी इमारती उभ्या आहेत. तसेच देशातील सर्वाधिक वर्दळीच्या विमानतळांपैकी एक असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरातही अशा तांत्रिक अडचणींवर नियोजनबद्ध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मग नाशिक प्रकल्पाच्या बाबतीतच हा प्रश्न इतका अडथळा का ठरला? या तांत्रिक अडचणींवर पर्यायी उपाय शोधण्याचा गंभीर प्रयत्न झाला होता का, याची माहिती जनतेसमोर येणे आवश्यक आहे. याशिवाय, राज्यातील महत्त्वाचे औष्णिक वीज प्रकल्प एकामागोमाग बंद करण्याच्या निर्णयांमुळे त्यांच्या ताब्यातील हजारो एकर मौल्यवान शासकीय जमिनींच्या भवितव्याबाबतही शंका निर्माण होत आहेत. तसेच, या निर्णयामुळे भविष्यात महाजेनकोमध्ये निर्माण होणाऱ्या नवीन रोजगाराच्या संधींनाही मोठा फटका बसू शकतो. परिणामी, नव्या भरती प्रक्रियेला अल्पविराम लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही, असा प्रश्न नागरिकांच्या मनात उपस्थित होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे शासनाने या सर्व बाबींमध्ये संपूर्ण पारदर्शकता ठेवून वस्तुस्थिती स्पष्ट करावी हीच जनतेची अपेक्षा आहे. माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळात देशभरातील औष्णिक वीज प्रकल्पांसाठी R&M धोरण राबविण्यात आले होते. मग चंद्रपूरसारख्या महत्त्वाच्या प्रकल्पासाठी हा पर्याय का वापरण्यात आला नाही ?जर आधुनिकीकरण करून प्रकल्प अधिक कार्यक्षम होऊ शकत असेल, तर तो बंद करण्याची घाई का? राज्याच्या ऊर्जा सुरक्षेवर परिणाम महाजेनको ही केवळ वीज निर्माण करणारी संस्था नाही, तर महाराष्ट्राच्या ऊर्जा स्वावलंबनाचा आधारस्तंभ आहे. जर मोठ्या प्रमाणावर सरकारी वीज निर्मिती कमी झाली तर भविष्यात राज्याची खासगी उत्पादकांवरील अवलंबित्व वाढू शकते. दीर्घकालीन वीज खरेदी करारांमुळे भविष्यातील वीज दर, पुरवठा आणि ऊर्जा नियोजनावर त्याचा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या निर्णयाचा दीर्घकालीन परिणाम स्वतंत्रपणे अभ्यासला जाणे आवश्यक आहे. कृती समितीच्या मागण्या महाजेनको, ऊर्जा विभाग आणि महाराष्ट्र शासनाने तातडीने पुढील बाबी कराव्यात. MERC च्या आदेशाविरोधात पुनर्विचार याचिका किंवा कायदेशीर उपाययोजना कराव्यात. महाजेनकोने प्रभावी आक्षेप का नोंदविले नाहीत याची चौकशी करावी. चंद्रपूर, खापरखेडा, नाशिक आणि भुसावळ प्रकल्पांचा स्वतंत्र तांत्रिक व आर्थिक अभ्यास प्रसिद्ध करावा. R&M चा पर्याय प्रथम विचारात घ्यावा. कोणत्याही युनिटचे डी-कमिशनिंग करण्यापूर्वी सार्वजनिक सुनावणी आयोजित करावी. राज्याच्या ऊर्जा सुरक्षेला प्राधान्य देणारे धोरण जाहीर करावे. महाजेनको ही महाराष्ट्राच्या जनतेच्या पैशातून उभी राहिलेली संस्था आहे. तिची कार्यक्षम युनिट्स बंद करण्याचा कोणताही निर्णय पूर्ण पारदर्शकतेने, तांत्रिक पुराव्यांवर आणि सार्वजनिक हित लक्षात घेऊनच घेतला गेला पाहिजे. उपलब्ध आकडेवारीबाबत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेषतः MERC ने पूर्वी मंजूर केलेले काही टॅरिफ ₹4.30 प्रति युनिटपेक्षा कमी असतानाही संबंधित प्रकल्पांच्या आर्थिक व्यवहार्यतेबाबत वेगळा निष्कर्ष का काढला गेला, याचे स्पष्ट स्पष्टीकरण आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या ऊर्जा स्वावलंबनाचा प्रश्न हा केवळ एका कंपनीचा नाही, तर राज्याच्या आर्थिक आणि औद्योगिक भवितव्याचा प्रश्न आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेचे पुनर्मूल्यांकन करून पारदर्शक निर्णय घेणे ही आजची गरज आहे.●●






भगवंतजी भगत
मो. 9423788232

# चतुर्थ धम्मसंगीती
## त्रिपिटकाच्या लेखनबद्ध परंपरेची ऐतिहासिक सुरुवात




भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या शुद्ध धम्मवचनाचे जतन करण्यासाठी विविध काळात धम्मसंगिती आयोजित करण्यात आल्या. या धम्मसंगित्यांमुळे बुद्धवचनाची शुद्धता, सातत्य आणि परंपरा अबाधित राहिली. त्यापैकी लंकेत झालेली चतुर्थ धम्मसंगीती ही बौद्ध इतिहासातील अत्यंत महत्त्वाची घटना मानली जाते. कारण याच संगितीत प्रथमच भगवान बुद्धांचे धम्मवचन केवळ मुखोद्गत परंपरेत न ठेवता लेखनबद्ध करण्यात आले आणि त्यातून त्रिपिटकाचे अमूल्य स्वरूप पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित झाले. सम्राट धम्माशोकाच्या काळात भारतातून बौद्ध धम्माचा प्रसार सिंहलद्वीपात (आजचे श्रीलंका) झाला. सम्राट अशोक आणि सिंहलचे राजा देवानंपियतिस्स यांच्यात घनिष्ठ मैत्री होती. राज्याभिषेकानिमित्त राजा देवानंपियतिस्स यांनी सम्राट अशोकांना मौल्यवान भेटवस्तू पाठविल्या. त्याबदल्यात सम्राट अशोकांनी त्यांना सर्वश्रेष्ठ अशी बुद्ध, धम्म आणि संघ या त्रिरत्नांची शरण स्वीकारण्याचा संदेश पाठविला. त्याचबरोबर आयुष्यमान महिंद (महेंद्र) थेर, भिक्षुणी संघमित्रा आणि अनेक भिक्खू-भिक्षुणींना श्रीलंकेत धम्मप्रचारासाठी पाठविले. संघमित्रा यांनी बोधीवृक्षाची पवित्र फांदी अनुराधापूर येथे आणली. तेथे महाविहाराची स्थापना झाली आणि संपूर्ण लंकेत बुद्धधम्माची भक्कम पायाभरणी झाली. पुढील काही काळात दक्षिण भारतातील तमिळ आक्रमणांमुळे श्रीलंकेत अस्थिरता निर्माण झाली. नंतर राजा दुठ्ठगामिनीने तमिळ आक्रमकांचा पराभव करून देशात पुन्हा शांतता प्रस्थापित केली. त्याने अनेक विहार, स्तूप आणि धार्मिक स्मारके उभारून बौद्ध धम्माला नवे बळ दिले. तथापि, बुद्धवचनाची परंपरा अद्यापही केवळ पाठांतरावर आधारित होती. सुत्त, विनय आणि अभिधम्म यांचे ज्ञान पिढ्यान्पिढ्या स्मरणशक्तीच्या आधारावरच जतन केले जात होते. ईसापूर्व पहिल्या शतकात राजा वट्टगामिनी अभय यांच्या काळात एक महत्त्वाची घटना घडली. एका विहारात त्यांनी एका स्थविराला धम्मपाठ न करणाऱ्या श्रामणेराला कठोर शिक्षा करताना पाहिले. त्या प्रसंगामुळे राजाला जाणवले की, जर पाठांतराची परंपरा खंडित झाली तर बुद्धांचे मूळ वचन कायमचे नष्ट होऊ शकते. ही चिंता त्यांनी संघनायकांसमोर व्यक्त केली. याच काळात भारतातून आलेल्या एका विद्वान भिक्खूने अत्यंत दूरदर्शी सल्ला दिला. त्यांनी सांगितले की, बुद्धवचन केवळ स्मरणात न ठेवता लेखनबद्ध केले पाहिजे. त्यामुळे धम्माची शुद्धता कायम राहील आणि भविष्यातील पिढ्यांनाही मूळ स्वरूपातील बुद्धवचन उपलब्ध होईल. हा सल्ला राजा वट्टगामिनी अभय आणि संघाने स्वीकारला. यानंतर संपूर्ण श्रीलंकेतील विद्वान स्थविर आणि भिक्खूंना अनुराधापूर येथे बोलावण्यात आले. वर्षावासाच्या काळात आयोजित करण्यात आलेल्या या महान धम्मसंगितीत सुमारे पाचशे विद्वान स्थविर सहभागी झाले. सर्वप्रथम सुत्तपिटकाचे सामूहिक सांगायन करण्यात आले. त्यानंतर विनयपिटक आणि अभिधम्मपिटक यांचेही अचूक उच्चारण करून त्यांचे लेखन करण्यात आले. अनुभवी लेखकांनी ताडपत्रांवर हे संपूर्ण धम्मवचन काळजीपूर्वक लिहून ठेवले. या कार्यातून प्रथमच बुद्धवचन तीन प्रमुख विभागांमध्ये संकलित झाले. सुत्तपिटकात भगवान बुद्धांची प्रवचने, विनयपिटकात भिक्खू-भिक्खुणी संघासाठीचे शिस्तनियम, तर अभिधम्मपिटकात बौद्ध तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास समाविष्ट करण्यात आला. या तीन विभागांना एकत्रितपणे त्रिपिटक असे नाव प्राप्त झाले. पुढे याच त्रिपिटकाच्या आधारावर अनेक अट्ठकथा, टीका आणि बौद्ध ग्रंथांची निर्मिती झाली. चतुर्थ धम्मसंगीतीचे सर्वांत मोठे योगदान म्हणजे बुद्धवचन कायमस्वरूपी सुरक्षित करणे होय. अनेक राजकीय उलथापालथी, युद्धे आणि नैसर्गिक संकटे आली, तरीही श्रीलंकेतील भिक्खू संघाने त्रिपिटकाचे जतन अत्यंत निष्ठेने केले. त्यामुळे पुढील अनेक शतकांनंतर भारतासह संपूर्ण जगाला मूळ पाली त्रिपिटक उपलब्ध होऊ शकले. आज जगभरात बौद्ध साहित्याचा जो प्रचंड वारसा अभ्यासला जातो, त्यामागे या चतुर्थ धम्मसंगीतीचे ऐतिहासिक योगदान आहे. चतुर्थ धम्मसंगीती हा केवळ धार्मिक सोहळा नव्हता, तर ज्ञानसंवर्धन, सांस्कृतिक जतन आणि मानवतेच्या बौद्धिक इतिहासातील एक क्रांतिकारी टप्पा होता. भगवान बुद्धांचा करुणा, प्रज्ञा आणि समतेचा संदेश आजही जगभर पोहोचत आहे, त्यामागे राजा वट्टगामिनी अभय, श्रीलंकेतील विद्वान स्थविर आणि भिक्खू संघ यांचे अमूल्य योगदान आहे. म्हणूनच चतुर्थ धम्मसंगीती ही बौद्ध इतिहासातील सुवर्णपान मानली जाते. त्रिपिटकाचे लेखनबद्धीकरण हा मानवजातीच्या सांस्कृतिक वारशातील एक महान ऐतिहासिक ठेवा असून, बुद्धवचनाच्या चिरंतन संरक्षणाचे हे अद्वितीय कार्य आजही संपूर्ण बौद्ध जगत कृतज्ञतेने स्मरण करते.●●

**तथागताची सत्यगाथा**



देविदास राऊत
(बौद्धाचार्य)
मो. 8668238330

# शेतीच्या वेदना अजूनही कायम

## दर तासाला विझणारा एक जीव
## शेतीच्या संकटाची विदारक कहाणी




भारतातील शेतीक्षेत्र आजही गंभीर संकटातून जात आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या (एनसीआरबी) 'भारतातील आकस्मिक मृत्यू आणि आत्महत्या २०२४' या अहवालानुसार, २०२४ मध्ये देशभरात शेतीशी संबंधित १०,५४६ शेतकरी आणि शेतमजुरांनी आत्महत्या केल्या. एकूण आत्महत्यांपैकी हे प्रमाण सुमारे ६.२ टक्के आहे. २०२३ च्या तुलनेत हा आकडा किंचित कमी असला तरी वास्तव बदललेले नाही. आजही देशात दररोज सरासरी २८, म्हणजेच दर तासाला एक शेतकरी किंवा शेतमजूर आत्महत्या करीत आहे. त्यामुळे आकडेवारीतील किरकोळ घट ही संकट कमी झाल्याचे लक्षण नसून, ग्रामीण भारतातील असुरक्षिततेची तीव्रता कायम असल्याचेच दर्शवते. या अहवालातील सर्वाधिक चिंताजनक बाब म्हणजे आत्महत्या करणाऱ्यांमध्ये शेतमजुरांचे वाढते प्रमाण. २०२४ मधील एकूण कृषी आत्महत्यांपैकी ५,९१३ म्हणजे तब्बल ५६ टक्के मृत्यू शेतमजुरांचे होते. २०२० मध्ये हे प्रमाण ४८ टक्क्यांपेक्षा कमी होते. यावरून जमीन नसलेले, रोजंदारीवर उदरनिर्वाह करणारे शेतमजूर अधिक असुरक्षित बनत असल्याचे स्पष्ट होते. नाबार्डच्या सर्वेक्षणानुसार, शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्नातील वाटा सातत्याने घटत असून, मजुरीवर अवलंबून राहणाऱ्यांची संख्या वाढत आहे. मात्र या वर्गाला पीकविमा, कर्जमाफी किंवा इतर संरक्षणात्मक योजनांचा लाभ बहुतांश वेळा मिळत नाही. राज्यनिहाय आकडेवारीत महाराष्ट्राचे चित्र सर्वाधिक वेदनादायी आहे. २०२४ मध्ये राज्यात ३,८२४ शेतकरी व शेतमजुरांनी आत्महत्या केल्या. म्हणजे देशातील प्रत्येक तीन कृषी आत्महत्यांपैकी एक महाराष्ट्रात घडली. अतिवृष्टी, दुष्काळ, अवकाळी पाऊस आणि हवामानातील अनिश्चितता यामुळे राज्यातील लाखो हेक्टर पिकांचे नुकसान झाले. कर्नाटकात २,९७१, मध्य प्रदेशात ८३५, आंध्र प्रदेशात ७८०, तमिळनाडूत ५०३ आणि छत्तीसगडमध्ये ४८६ कृषी आत्महत्या नोंदवण्यात आल्या. काही राज्यांत घट दिसली असली तरी अनेक राज्यांत ही समस्या अधिक तीव्र होत आहे. उत्तर प्रदेशासारख्या मोठ्या कृषिप्रधान राज्यातही शेतमजुरांच्या आत्महत्यांमध्ये वाढ दिसून येत आहे. गेल्या पाच वर्षांत १४ राज्यांमध्ये कृषी आत्महत्या वाढल्या, तर १३ राज्यांत शेतमजुरांच्या आत्महत्यांचे प्रमाण शेतकऱ्यांपेक्षा अधिक झाले आहे. यावरून हे संकट आता केवळ जमीनधारक शेतकऱ्यांपुरते मर्यादित न राहता, ग्रामीण अर्थव्यवस्थेतील सर्वात दुर्बल घटकापर्यंत पोहोचल्याचे स्पष्ट होते. भारतातील कृषी आत्महत्यांचा इतिहास जवळपास तीन दशकांचा आहे. १९९५ ते २०२३ या कालावधीत देशात सुमारे ३.९४ लाख शेतकरी आणि शेतमजुरांनी आत्महत्या केल्याचे विविध अभ्यासांतून स्पष्ट झाले आहे. जागतिक व्यापार संघटनेत भारताच्या प्रवेशानंतर शेतीवरील खर्च वाढला, उत्पादन खर्च आणि कर्जाचा बोजा वाढत गेला, तर बाजारभावातील अनिश्चिततेमुळे उत्पन्न घटले. विशेषतः कापूस उत्पादक भागांमध्ये ही समस्या अधिक तीव्र झाली. २००२ हे वर्ष सर्वाधिक भीषण ठरले, जेव्हा एका वर्षात जवळपास १८ हजार शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली. मनरेगासारख्या योजनांमुळे काही काळ आत्महत्यांच्या संख्येत घट झाली होती. केरळ, पश्चिम बंगाल आणि काही इतर राज्यांमध्ये त्याचे सकारात्मक परिणाम दिसून आले. मात्र महाराष्ट्र आणि कर्नाटकसारख्या पावसावर अवलंबून असलेल्या राज्यांत हा दिलासा दीर्घकाळ टिकला नाही. हवामान बदल, उत्पादन खर्च, कर्जबाजारीपणा आणि बाजारातील अनिश्चितता यामुळे शेतकरी पुन्हा संकटात सापडले. संशोधनातूनही पावसाच्या लहरीपणाचा आणि शेतकरी आत्महत्यांचा थेट संबंध स्पष्ट झाला आहे. ज्यावर्षी दुष्काळ किंवा पावसाची मोठी तूट असते, त्यावर्षी आत्महत्यांचे प्रमाण वाढते. महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडसारख्या दुष्काळप्रवण राज्यांत ही स्थिती विशेष गंभीर आहे. अधिकृत आकडेवारीही वास्तवाचे संपूर्ण चित्र मांडत नाही. अनेकदा राज्य सरकारे आणि एनसीआरबीच्या आकडेवारीत मोठी तफावत दिसून येते. महिला शेतकऱ्यांच्या बाबतीत ही समस्या अधिक गंभीर आहे. जमिनीच्या नोंदींमध्ये नाव नसल्याने त्यांच्या आत्महत्यांची नोंद अनेकदा 'गृहिणी' म्हणून केली जाते. त्यामुळे महिला शेतकऱ्यांच्या समस्याही अधिकृत आकडेवारीत झाकोळल्या जातात.

आत्महत्येनंतर कुटुंबांची परिस्थिती आणखी बिकट होते. कर्जफेडीसाठी जमीन, जनावरे विकावी लागतात. अनेक विधवांना भरपाई, निवृत्तीवेतन किंवा जमिनीवरील हक्क मिळत नाही. त्यामुळे त्यांना मजुरी, पशुपालन किंवा असंघटित कामांवर अवलंबून राहावे लागते. अनेक कुटुंबे रोजगाराच्या शोधात स्थलांतर करतात आणि गरिबीचे चक्र पुढील पिढीपर्यंत पोहोचते. या पार्श्वभूमीवर शेतमजुरांना स्वतंत्र सामाजिक सुरक्षा देणे, मनरेगाची व्याप्ती वाढवणे, हमी रोजगाराचे दिवस वाढवणे, वेळेवर मजुरी देणे आणि ग्रामीण रोजगारनिर्मितीला चालना देणे अत्यावश्यक आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांसाठी हमीभावाची प्रभावी अंमलबजावणी, पीकविमा सुलभ करणे, कर्जव्यवस्था मजबूत करणे आणि हवामान बदलाशी सुसंगत शेती पद्धतींना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. शेतकरी आणि शेतमजुरांच्या आत्महत्यांकडे केवळ आकडेवारी म्हणून पाहून चालणार नाही. प्रत्येक आत्महत्येमागे उद्ध्वस्त झालेले एक कुटुंब, तुटलेली स्वप्ने आणि समाजाचे अपयश दडलेले आहे. दर तासाला विझणारा एक जीव ही केवळ सांख्यिकीय नोंद नसून देशाच्या कृषी व्यवस्थेसमोरील गंभीर इशारा आहे. ही मालिका थांबवायची असेल तर संवेदनशील धोरणे, प्रभावी अंमलबजावणी आणि समाजाची सामूहिक जबाबदारी या तिन्ही गोष्टी एकत्रितपणे राबवाव्या लागतील.●●

**वर्तमान**



विकास मेश्राम
मो. 7875592800

